TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार    कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र    APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : ३१ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : २९ जुलै ते ४ ऑगस्ट २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

# ओबीसींना फसवण्यासाठी देवेंद्र फडणवीस व जरांगे पाटील, प्रकाश आंबेडकरांचं मोठं विधान



**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या मराठा आरक्षणाचा विषय तापू लागला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्यामुळे थेट निवडणुकीत उतरण्याचा इशारा दिला आहे. गेल्या काही महिन्यांपासून मनोज जरांगे पाटील हे सातत्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर आक्रमक टीका करताना दिसत आहेत. फडणवीसांकडूनही त्यावर स्पष्ट भूमिका मांडली जात आहे. मात्र, मराठा आरक्षणावरून या दोघांमध्ये चालू असणाऱ्या वादावर आता प्रकाश आंबेडकर यांनी मोठं विधान केलं आहे. तसेच या भांडणामागे ओबीसींना फसवण्याचा हेतू असल्याचा दावा त्यांनी केला आहे. मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षणाचा लाभ मिळावा, या आपल्या मागणीवर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. मात्र, राज्यातील ओबीसी नेते व ओबीसी समाजाकडून याला तीव्र विरोध दर्शवण्यात आला आहे. लक्ष्मण हाकेंनी यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्याप्रमाणेच उपोषणाचं हत्यारही उपसलं होतं. या पार्श्वभूमीवर राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न जटिल झालेला असताना कोणत्याही राजकीय पक्षाकडून यावर स्पष्ट भूमिका मांडली जात नसल्याचं दिसून येत आहे. मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण दिलं जावं की नाही? याबाबत सर्वच पक्षांकडून चर्चेचं आवाहन केलं जात असताना प्रकाश आंबेडकरांनी केलेला दावा चर्चेचा विषय ठरला आहे. प्रकाश आंबेडकरांनी शनिवारी संध्याकाळी उशीरा सोलापुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध राजकीय मुद्द्यांवर त्यांची भूमिका मांडली. राज्यातील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर प्रकाश आंबेडकरांनी गेल्या काही दिवसांक आक्रमक भूमिका घेतली आहे. यासंदर्भात त्यांना विचारणा केली असता इतर राजकीय पक्ष ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण दिलं जावं की नाही ? यावर स्पष्ट भूमिका मांडत नसल्याचं त्यांनी नमूद केलं. यात त्यांनी भाजपाप्रमाणेच उद्धव ठाकरे व शरद पवार यांनाही लक्ष्य केलं. महाराष्ट्र जळतोय. सत्तेवर येत असताना महाराष्ट्र ज्या कारणांमुळे जळतोय, त्यावर भूमिका न मांडणं चुकीचं आहे. उद्धव ठाकरेंनी भावी पंतप्रदान, भावी मुख्यमंत्री व्हावं. पण या ज्वलंत प्रश्नावर, मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मनोज जरांगेंच्या मागणीवर त्यांनी बोलावं, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

ओबीसींमध्ये मराठ्यांना घुसवलं जाऊ नये, ही आमची भूमिका आहे. गरीब मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी त्यांना वेगळं ताट दिलं पाहिजे. वेगवेगळ्या निकषांनुसार हे आरक्षण दिलं जाऊ शकतं, त्यात फक्त आर्थिक निकष हा मुद्दा नाही. ते निकष तुम्हाला ठरवावे लागतात, असंही प्रकाश आंबेडकर म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून शरद पवार यांनाही लक्ष्य केलं. शरद पवारांनी शनिवारी पत्रकार परिषदेत या मुद्द्यावर सगळ्यांना एकत्र घेऊन चर्चा

पान २ वर

## जागावाटपाच्या वाटाघाटींसाठी काँग्रेसची १० नेत्यांची समिती; पटोले, थोरात, पृथ्वीराज चव्हाण यांचा समावेश



**मुंबई :** महाविकास आघाडीत जागावाटपाच्या वाटाघाटी करण्याकरिता काँग्रेसने १० नेत्यांचा समावेश असलेली समिती स्थापन केली आहे. राज्य आणि मुंबईतील जागावाटपाची चर्चा करण्याची जबाबदारी या समितीमधील नेत्यांवर असेल. महाविकास आघाडीत जागावाटप हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाने आधीच अधिक जागा लढविण्याचे सुतोवाच केले आहे. शिवसेना ठाकरे गटाने लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला नमविले होते. सांगलीची काँग्रेसची हक्काची जागा ठाकरे गटाने जबरदस्तीने मिळविली होती. या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याचे काँग्रेसपुढे आव्हान आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात सर्वाधिक १३ जागा मिळाल्याने विधानसभेत जास्त जागा मिळाल्या पाहिजेत, अशी काँग्रेस नेत्यांची अपेक्षा आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट, शेकाप, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पार्टी या पक्षांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या यशाने सर्वच मित्र पक्षांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १२ जागांवर दावा केला आहे. समाजवादी पार्टीला ३५ जागा हव्या आहेत. याशिवाय अन्य काही छोट्या पक्षांना जागा हव्या आहेत. काँग्रेसला किमान १०० जागा मिळाव्यात, अशी प्राथमिक चर्चा झाली आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याशी वाटाघाटी करताना अधिक जागा पदरात पाडून घेण्याचे या १० जणांच्या समितीसमोर मोठे आव्हान असेल.

## भाजपने विधानसभा निवडणुकीत २८८ जागा लढवाव्यात; खासदार नारायण राणे यांच्या वक्तव्यावर शिंदे गटाकडून नापसंती



**मुंबई :** भाजपने विधानसभा निवडणुकीत २८८ जागा लढवाव्यात, अशी टिप्पणी माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी भाजप प्रदेश कार्यालयात शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली. मात्र पक्षाचे वरिष्ठ नेते महायुतीतील जागावाटपाचा निर्णय घेतील, अशी भूमिका मांडली. राणे यांच्या या वक्तव्याबाबत शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी आक्षेप घेतला असून भाजप २८८ जागा लढणार असेल, तर महायुती कशाला आहे, असा सवाल केला. केंद्रीय अर्थसंकल्पावर विरोधकांनी केलेल्या टीकेत कोणतेही तथ्य नाही आणि महाराष्ट्रातील विविध योजनांसाठी केंद्र सरकारने मोठा निधी दिला असल्याचे सांगून राणे यांनी राजकीय मुद्द्यांवरील पत्रकारांच्या प्रश्नांवरही उत्तरे दिली. महायुतीतील जागावाटपाची चर्चा, कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील, याविषयीच्या प्रश्नांवर बोलताना राणे यांनी भाजपने सर्वच २८८ जागा लढवाव्यात, असे भाष्य केले. राज ठाकरे विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढणार असल्याचे मनसेने जाहीर केले आहे, याबाबत विचारता त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. पण निवडणूक आचारसंहिता लागू होईपर्यंत जागांची संख्या कमी-जास्त होईल, काही समझोता होईल, असा टोलाही लगावला. नारायण राणे यांनी भाजपने सर्व २८८ जागा लढविण्याची टिप्पणी केल्याने शिवसेना शिंदे गटात त्याची प्रतिक्रिया उमटली. सर्व २८८ जागा लढण्याचे नारायण राणे यांचे मत असल्याचे शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते खासदार नरेश म्हस्के यांनी प्रत्युत्तर दिले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसे मत नाही. महायुतीच्या जागावाटपात प्रत्येक पक्षाला ताकदीनुसार जागा मिळतील. त्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते निर्णय घेतील, अशी पुष्टीही म्हस्के यांनी जोडली.

# मुंबईकरांना स्वाईन फ्लूचा विळखा, रोज २० ते २५ रुग्णांची नोंद

**मुंबई** : पावसाळ्यात डेंग्यू, हिवतापाबरोबरच स्वाईन फ्लूच्या रुग्ण वाढू लागले असून मुंबईत खासगी रुग्णालयांत दररोज साधारणपणे २० ते २५ रुग्ण स्वाईन फ्लूचे आढळून येत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे मुंबईकरांभोवती स्वाईन फ्लूचा विळखा घट्ट होत असल्याचे दिसत आहे. मुंबई महानगरपालिकेकडून पावसाळी आजारांना प्रतिबंध करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यापाठोपाठ आता मुंबईमध्ये स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्येही वाढ होत आहे. मुंबई महानगरपालिकेने पावसाळी आजारांबाबत १६ जुलै रोजी जाहीर केलेल्या अहवालानुसार मुंबईत स्वाईन फ्लूचे ५३ रुग्ण सापडले होते. ही संख्या तुलनेने कमी वाटत असली तरी मुंबईतील अनेक खासगी रुग्णालये व दवाखान्यांमध्ये स्वाईन फ्लूची लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात येत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून तापाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. यातील जवळपास १० ते १२ रुग्णांमध्ये



सर्वसामान्य तापाबरोबरच स्वाईन फ्लूची लक्षणेही दिसून येत आहेत. या रुग्णांची रक्त तपासणी केल्याशिवाय नेमके निदान करणे अशक्य असते. त्यामुळे त्यांना तपासणी करण्यास सांगून ज्वरावरील उपचार सुरू केले जातात, असे चेंबूरमधील एका खासगी रुग्णालयात वैद्यकीय सल्लागार असलेले डॉ. राजांशू तिवारी यांनी सांगितले. तापाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असून, या रुग्णांमध्ये स्वाईन फ्लूची लक्षणे दिसून येत आहेत. मात्र तपासण्यांनंतर फार कमी रुग्णांमध्ये स्वाईन फ्लू आढळून आल्याची जे.जे. रुग्णालयातील एका डॉक्टरने दिली. मुंबईत तापाचे रुग्ण वाढत आहेत. मात्र त्यातील २० ते २५ रुग्णांमध्ये स्वाईन फ्लू सदृश लक्षणे दिसून येत आहेत. या रुग्णांना स्वाईन फ्लूची तपासणी करण्यास सांगण्यात येत आहे. दरवर्षी आजारांच्या विषाणूंच्या गुणसूत्रांमध्ये काही प्रमाणात बदल होऊन त्यांचे उत्परिवर्तन होते. यातील नवीन विषाणू हे सौम्य किंवा घातक असण्याची शक्यता असते. सौम्य विषाणू असल्यास त्याचा फारसा परिणाम जाणवत नाही. परंतु घातक असल्यास रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसून येते. यावेळी रुग्णांमधील लक्षणांमध्ये वाढ झाली असल्याने स्वाईन फ्लूच्या विषाणूमध्ये काही बदल झाले असण्याची शक्यता असल्याची माहिती डॉक्टरने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दिली आहे.

## लोकलमध्ये स्टंट करणाऱ्या तरुणाने एक पाय आणि हात गमावला

**मुंबई** : एका तरुणाचा शिवडी स्टेशनवरचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर याच महिन्यात व्हायरल झाला होता. लोकल सुरु असताना हा तरुण लोकलला लटकून पाय घासत जातो आणि प्लॅटफॉर्म संपल्यावर लोकलमध्ये चढतो असं या व्हिडीओत दिसत होतं. या तरुणाचा शोध लागला आहे, दुसऱ्या एका स्टंटमध्ये या तरुणाला एक हात आणि पाय गमावावा लागला आहे.



त्यामुळे आता त्याने असे स्टंट करु नका असं आवाहन केलं आहे. मध्य रेल्वेने या तरुणाचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. तसंच असे स्टंट करु नका हे आवाहन केलं आहे. मराठी भाषेत मोरा तुझे गेले पाय, आता रडून उपयोग काय ? अशी एक म्हण आहे त्याचा तंतोतंत प्रत्यय या घटनेने तरुणाला दिला आहे यात शंकाच नाही. लोकल ट्रेनच्या दारात लटकून तरुण स्टंट करताना दिसतो आहे. लोकल सुरु झाली आहे. त्या धावत्या लोकलमधल्या एका डब्याच्या खांबाला पकडून हा तरुण प्लॅटफॉर्मवर पाय ठेवून वेगाने जाताना दिसतो आहे. त्याला डब्यातले लोक सांगत आहेत की असं करु नकोस तरीही तो कुणाचंही ऐकत नाही. शेवटी प्लॅटफॉर्म संपायला येतो तेव्हा घाईने तो डब्यात चढतो आहे. अशा हुल्लडबाज प्रवाशांमुळे शिस्तीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रास होतो. अनेकांनी या व्हिडीओवर प्रतिक्रिया दिल्या. अशा स्टंटबाजांना आवरा, हवेत कशाला जीवघेणे स्टंट ?, असे लोक स्वत:ची माती करुन घेतात अशा प्रतिक्रिया प्रवाशांनी या व्हायरल व्हिडीओवर दिल्या. षेसमचै मध्ये अनेकदा असे स्टंट करताना तरुण दिसतात. त्यांनी असे स्टंट करु नयेत असं आवाहन मध्य रेल्वेने केलं आहे.

## पुनर्वसनातील घरावर संपूर्ण फंजीबल चटईक्षेत्रफळ देणे बंधनकारक नाही, म्हाडाकडून विकासकांना दिलासा

**मुंबई** : पुनर्विकास प्रकल्पात कमाल ३५ चौरस मीटर किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या क्षेत्रफळावर विकास नियंत्रण नियमावलीनुसार ३५ टक्के मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ लागू असले तरी ते संपूर्णपणे पुनर्वसन सदनिकेला उपलब्ध करून देणे विकासकावर बंधनकारक नाही. मात्र यापेक्षा कमी फंजीबल चटईक्षेत्रफळ दिल्यास उर्वरित फंजीबल चटईक्षेत्रफळ अन्यत्र कुठेही वापरता येणार नाही, असे परिपत्रक महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) जारी केले आहे. या परिपत्रकामुळे मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ वापराबाबत असलेली संदिग्धता दूर करताना ते संपूर्ण पुनर्वसन सदनिकेला देणे बंधनकारक नसल्याचे स्पष्ट करून विकासकांना दिलासा दिला आहे. त्यामुळे रहिवाशांना त्यांच्या प्रत्यक्ष वापरातील क्षेत्रफळावर संपूर्ण फंजीबल चटईक्षेत्रफळाचा आग्रह धरता येणार




नाही. चारकोप (कांदिवली पश्चिम) येथील काही सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ विक्रीसाठी वापरण्यात आल्याचा घोटाळा बाहेर आला होता.या सर्व संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांना म्हाडाने पुन्हा नव्याने अतिरिक्त चटईक्षेत्रफळ खरेदी करण्यास सांगितले होते. ज्यांचे वापरातील क्षेत्रफळ अधिक आहे, अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्येच असा घोटाळा झाल्याचा दावा म्हाडाने केला होता. याबाबत म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जैस्वाल यांनी याबाबत धोरण निश्चित करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार म्हाडाच्या इमारत परवानगी कक्षाचे उपमुख्य अभियंता भूषण देसाई यांच्या सहीने परिपत्रक जारी करण्यात आले आहे. ३५ टक्के मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ संपूर्णपणे पुनर्वसन सदनिकेसाठी लागू करणे विकासकांना बंधनकारक नसल्याचे त्यात स्पष्ट केले आहे. या परिपत्रकात म्हटले आहे की, पुनर्विकास प्रकल्पातील सध्या अस्तित्वात असलेल्या क्षेत्रफळावर ३५ टक्के अतिरिक्त क्षेत्रफळाचा लाभ दिल्यानंतर आणखी ३५ टक्के मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ देणे विकासकांना बंधनकारक नाही. विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार ३५ चौरस मीटर (३७६ चौरस फूट) क्षेत्रफळ देणे आवश्यक आहे. त्यावर मोफत फंजीबल चटईक्षेत्रफळ ३५ टक्क्यांपेक्षा कमी दिल्यास उर्वरित चटईक्षेत्रफळ विक्रीसाठी वापरता येणार नाही. याबाबत स्पष्ट धोरण नव्हते. आता या धोरणामुळे याबाबत असलेली संदिग्धता दूर झाल्याचा दावा म्हाडाने केला आहे. प्रत्यक्ष वापरावयाच्या चटईक्षेत्रफळावर ३५ टक्के अतिरिक्त चटईक्षेत्रफळ वापरण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत आहे. हे अतिरिक्त चटईक्षेत्रफळ म्हणजे फंजीबल चटईक्षेत्रफळ. पुनर्वसनातील सदनिकांना ते मोफत तर विक्री करावयाच्या सदनिकांना अधिमूल्य भरल्यानंतर वापरता येते.

## ओबीसींना फसवण्यासाठी देवेंद्र फडणवीस व जरांगे पाटील, प्रकाश आंबेडकरांचं मोठं विधान

पान १ वरुन

करण्याचं आवाहन राज्य सरकारला केलं. त्यावर प्रकाश आंबेडकरांनी उलट शरद पवार यांनीच भूमिका स्पष्ट करण्याचं आवाहन केलं. ही पळवाट आहे. राजकीय पक्ष म्हणून तुम्ही उद्या सत्तेत आलात तर तुम्हाला या स्थितीला उद्या तोंड द्यावं लागेल. तसं असेल, तर जरांगेंच्या मागणीच्या बाजूने तुम्ही आहात की विरोधात हे तुम्हाला स्पष्ट असायला हवं. हे सगळे ओबीसींच्या विरोधात आहेत. म्हणून या पळवाटा काढल्या जात आहेत. तुम्ही राजकीय भूमिका घेतल्यावर लोकांना तुमचा मुद्दा कळतो. त्यामुळेच आमच्याबद्दल ना ओबीसी नाराज आहेत ना मराठे नाराज आहेत, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. दरम्यान, यावेळी प्रकाश आंबेडकरांनी देवेंद्र फडणवीसांनाही लक्ष्य केलं. देवेंद्र फडणवीस आणि मनोज जरांगे यांचं भांडण हे नकली आणि फसवं आहे. जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केलं आहे. त्यामुळे ओबीसींना असं वाटतंय की जरांगेंच्या विरोधात कोण, तर देवेंद्र फडणवीस. त्यामुळे आपले देवेंद्र फडणवीस असा शब्दप्रयोग सुरू झाला आहे. पण देवेंद्र फडणवीस ज्या पक्षाचे आहेत, त्या भारतीय जनता पक्षाकडून यासंदर्भात भूमिकाच घेतली जात नाहीये. त्यामुळे हे नकली भांडण आहे. ते ओबीसींना फसवण्यासाठी ठरवून भांडत आहेत, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

# प्रफुल्ल पटेल यांच्या नावाने बनावट व्हॉटसपि खाते, महाराष्ट्र सायबर पोलिसांकडून गुन्हा दाखल

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) नेते व राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नावाचा आणि छायाचित्राचा वापर करून बनावट व्हॉटस पि खाते तयार करण्यात आल्याची तक्रार महाराष्ट्र सायबर पोलिसांकडे दाखल झाली आहे. या बनावट व्हॉटस पि खात्याच्या माध्यमातून अनोळखी व्यक्ती ही आपणच प्रफुल्ल पटेल असल्याचे भासवत आहे. याप्रकरणी माहिती तंत्रज्ञान कायद्याद्वारे महाराष्ट्र सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. प्रफुल्ल पटेल यांच्या नावाने बनावट व्हॉटस पि खाते तयार केल्याचे तक्रारदार विवेक अग्निहोत्री यांना एका कार्यकर्त्याकडून २० जुलै



२०२४ रोजी समजले. त्यानंतर तक्रारदाराने नमूद धूरध्वनी क्रमांक हा ट्रू कॉलर या पिवर तपासून पाहिला आणि त्यावर प्रफुल्ल पटेल यांचे छायाचित्र असल्याचे आढळून आले. तसेच, व्हॉटस पिवर प्रफुल्ल पटेल यांचे नाव आणि छायाचित्र वापरल्याचे आढळून आले आणि त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांच्या नावाने बनावट व्हॉटस पि खाते उघडण्यात आल्याची तक्रारदाराला खात्री झाली. त्याने तात्काळ या बनावट खात्याचे स्क्रीनशॉट्स काढले. या सर्व प्रकरणाबाबत तक्रारदाराने प्रफुल्ल पटेल यांना तात्काळ माहितीही दिली आणि महाराष्ट्र सायबर पोलिसांकडे २३ जुलै रोजी तक्रार दाखल केली. तक्रारदाराने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सायबर पोलिसांनी संबंधित अनोळखी मोबाइल धारकाविरुद्ध ०८/२०२४ कलम -६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही अनोळखी व्यक्ती अद्याप सापडली नसून महाराष्ट्र सायबर पोलीस अधिक तपास करीत आहेत. याप्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे करीत असून ही कारवाई महाराष्ट्र सायबरचे विशेष पोलीस महानिरीक्षक यशस्वी यादव आणि महाराष्ट्र सायबरचे पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# भाजप महिला जिल्हाध्यक्षाच्या भावावर गुन्हा दाखल, मिरा रोडमध्ये ५ लाखांची वीज चोरी

**भाईंदर :** मिरा-भाईंदरमधील भाजप महिला जिल्हाध्यक्षांच्या भावावर




५ लाखांच्या वीज चोरीचा गुन्हा काशिमीरा पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. मिरा-भाईंदर भाजप पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष अनिता पाटील यांचा भाऊ राजेश चव्हाण हा पेणकर पाडा परिसरात राहतो. या घरासाठी चव्हाण हा अदानी वीज समूहाची वीज चोरून वापरत होता. याबाबत कंपनीला माहिती मिळताच कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी केली होती. यावेळी २६ हजार ७५८ इतके युनिट वापरल्याचे स्पष्ट झाले. यात अदानी वीज समूहाची जवळपास ५ लाख ४८ हजार इतक्या रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार काशिमिरा पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. त्यावरून चव्हाण विरोधात कलम १३५ अंतर्गत काशिमिरा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयांची सुरक्षा कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या हाती, ८३१ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणार

**मुंबई :** निवासी डॉक्टर, अध्यापक, परिचारिका, अधिकारी, कर्मचारी, रुग्ण व त्यांचे नातेवाईक त्याचबरोबर रुग्णालयातील यंत्रसामुग्री आदींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून राज्यातील १७ वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने सुरक्षा रक्षकांची भरती करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने घेतला आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील परिशिष्ट अमध्ये नमूद १७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयात प्रवेशित विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच संस्थेमधील प्राध्यापक / सह प्राध्यापक, कर्मचारी, रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांच्या




सुरक्षेसाठी कंत्राटी पद्धतीने सुरक्षा रक्षकांची भरती करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार दोन सुरक्षा अधिकारी, एक सहा-यक सुरक्षा रक्षक अधिकारी, दोन सुरक्षा निरीक्षक, १३ सुरक्षा पर्यवेक्षक आणि ८१३ सुरक्षा रक्षक अशी एकूण ८३१ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे सर्व सुरक्षा रक्षक महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित-पुणे, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ -मुंबई, रत्नागिरी जिल्हा सुरक्षा रक्षक महामंडळ, पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक महामंडळ यांच्या माध्यमातून घेण्यात येणार आहेत. कंत्राटी पद्धतीने सुरक्षा रक्षक भरण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून सर्व भत्त्यांसह ३० कोटी ५४ लाख ९७ हजार ९१३ रुपये वार्षिक खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.



अर्जदार : राजू रामभरोसा साहू
रा. : रुम नं. १०, ठाकुर वाडी चाळ, जीवन नगर,
गौराई पाडा, वसई (पू.), ता. वसई,
जि. पालघर - ४०१२०८.
मो.नं. ९०७५१५५३९३
दिनांक : ०५/०६/२०२३

प्रति,
मा. पोलिस निरिक्षक साहेब,
वालीव पोलिस स्टेशन,
वसई (पू.), जि. पालघर.

**विषय : पत्नी न सांगता निघून गेल्याबाबत तसेच तिने स्वमर्जीने मला न सांगता दुसरे लग्न केले असल्याबाबत.**

मा. महोदय,

मी अर्जदार **राजू रामभरोसा साहू**, सदर अर्जाव्दारे असे लिहून देतो की, मी वरील पत्यावर राहत असुन माझा विवाह **दिनांक २९/०१/२०१६** रोजी **रेणू साहू, आताचा पत्ता : रायपूर, छत्तीसगड** हिच्यासोबत झाला आहे. लग्नानंतर आम्ही वरील पत्यावर राहत होतो व आमचा संसार सुरळीत चालु होते.

परंतु **दिनांक २९/०१/२०२०** रोजी ती मला न सांगता कुठे निघून गेली याची मला कल्पना देखील नव्हती. त्यानंतर ०८-१० दिवसानंतर मला माझ्या पत्नीचा भाऊ **पंकज साहू (मो. नं. ७०००६२२९३०)** याने फोन केला व सांगितले की, **रेणू साहू** हीने दुसऱ्या मुलासोबत लग्न केले आहे व त्याच्यासोबत **रायपूर, छत्तीसगढ** मध्येच राहते. हे मला कळताच मी तिच्या घरी गेलो व तिच्या आई-वडीलांना सांगितले की, तुमच्या मुलीला बोलवा मला तिच्याशी बोलायचे आहे. त्यावर त्यांनी मला सांगितले की ति इथे येत नाही मग मी माझा व **रेणू साहू** आमचा घटस्फोट करून देण्यास सांगितले. तर तिच्या आई-वडीलांनी मला असे उत्तर दिले की, तिने तिच्या इच्छेनुसार लग्न केलेले असुन तुम्ही पण तुमच्या मर्जीने दुसरे लग्न करा.

महोदय, **रेणू साहू** गेल्यापासून आतापर्यंत माझा तिच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क झालेला नाही. तीने दुसरे लग्न तिच्या मर्जीने केलेले असुन तिच्या या निर्णयाची संपूर्ण जबाबदारी तिची स्वत:ची आहे. तसेच तिचे व तिच्या दुसऱ्या नवऱ्याचे फोटो मला तिच्या मैत्रिणीद्वारा मिळाले असुन ते मी सदर पत्रासोबत जोडलेले आहेत.

आपला विश्वासू,

Raju

राजू रामभरोसा साहू,

पोलीस ठाणे अंमलदार
वालीव पोलीस ठाणे

# राज्यात २०१९ ते २०२१ या काळात एक लाख महिला बेपत्ता, त्यांचा शोध घेण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका

**मुंबई :** राज्यात २०१९ ते २०२१ या कालावधीत सुमारे एक लाख महिला बेपत्ता झाल्या आहेत, असा दावा करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली आहे. तसेच, या महिलांचा शोध घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा स्थापन करण्याचे आदेश पोलिसांना द्यावेत, अशी मागणीही याचिकाकर्त्याने केली आहे. सरकारच्या कोषागार विभागात काम करणाऱ्या शहाजी जगताप या सांगलीतील माजी सैनिकाने ही जनहित याचिका केली आहे. जगताप यांची मुलगी विज्ञान शाखेच्या तिसऱ्या वर्षाला शिकत असताना डिसेंबर २०२१ मध्ये बेपत्ता झाली. जगताप यांनी सांगलीतील संजय नगर पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. मात्र, पोलीस त्यांच्या मुलीचा शोध घेऊ शकलेले नाहीत. मुलीचा शोध घेत असताना तिने इस्लाम धर्म स्वीकारून लग्न केल्याची माहिती आपल्याला मिळाली. आपण मुलीला केवळ दोन मिनिटांसाठी भेटलो. परंतु, त्यानंतर आजपर्यंत ती कुठे आहे आणि तिने कुटुंबीयांशी संबंध का तोडले हे माहीत




नसल्याचेही जगताप यांनी याचिकेत म्हटले आहे. मुलगी सज्ञान असल्यामुळेच पोलीस तिला घरी आणण्यासाठी कोणतेही प्रयत्न करीत नाहीत. मुलीला तिचे जीवन तिला हवे तसे जगायचे असल्याचेही आपल्याला कळले आहे. परंतु, तिचा शोध घेताना गेल्या काही वर्षांत आपल्या कुटुंबावर खूप आघात झाले आहेत आणि कुटुंब त्रासाला सामोरे जात आहे, असा दावाही जगताप यांनी याचिकेत केला आहे. दरम्यान, याच काळात आपल्याला गृह मंत्रालयाने प्रसिद्ध केलेली माहिती मिळाली. त्यानुसार, राज्यात १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रिया वर्षानुवर्षे सापडलेल्या नाहीत. आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये ३५ हजार ९९०, २०२० मध्ये ३० हजार ०८९ आणि २०२१ मध्ये ३४ हजार ७६३ महिला बेपत्ता झाल्याची आणि अद्याप त्यांचा शोध लागलेला नसल्याची नोंद झाल्याचे याचिकाकर्त्याने याचिकेत म्हटले आहे. महिला बेपत्ता होण्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, असा आरोप याचिकाकर्त्याने वकील मंजिरी पारसनीस यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेत केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने २००२ मध्ये या मुद्द्यावर काही आदेश दिले होते, परंतु, त्यानंतरही या समस्येबाबत अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन अत्यंत बेफिकीर आणि निष्काळजी असल्याचा दावाही याचिकाकर्त्याने केला आहे.

## भिवंडीत सहा वर्षीय मुलाची क्षुल्लक कारणावरून हत्या



**ठाणे :** भिवंडी येथील सहा वर्षीय मुलाची गळा दाबून हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सुधीर पवार असे मृत मुलाचे नाव असून याप्रकरणात पोलिसांनी अमोल चव्हाण (२२) याला अटक केली आहे. अमोल याने तरुणीची छेड काढून तिला मारहाण केली होती. हा प्रकार सुधीर याने पाहिला होता. त्यामुळे त्याने हत्या केल्याची कबूली दिली. विशेष म्हणजे, अमोल हा सुधीर याचा नातेवाईक असून त्यांच्या घरातच तो वास्तव्यास होता. भिवंडी येथील हायवे दिवे परिसरात सुधीर हा त्याच्या कुटुंबियांसोबत वास्तव्यास होता. त्यांच्या घरात अमोल चव्हाण राहत होता. रविवारी सुधीर हा बेशुद्ध अवस्थेत इमारतीच्या गच्चीवर आढळून आला. त्याला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, शवविच्छेदन करत असताना सुधीर याच्या गळ्याभोवती डॉक्टरांना व्रण आढळून आले होते. परंतु लहान मुलाला कोण मारेल असा विचार करत सुधीर याच्या वडिलांनी डॉक्टरांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले. पोलीस ठाण्यात याप्रकरणाची कागदपत्रे गेल्यानंतर पोलिसांनी सुधीरच्या वडिलांना संपर्क साधून त्यांना मुलाची हत्या झाल्याबाबत सांगितले. दरम्यान, अमोल हा देखील भिवंडीतून निघून गेला होता. तसेच त्याने मोबाईल देखील बंद केला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून नारपोली पोलिसांनी तपास पथके स्थापन केली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी तपास केला असता, अमोल हा छत्रपती संभाजीनगर येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर सापळा रचून पोलिसांनी अमोल याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबूली दिली. अमोलने त्याच्या इमारतीच्या गच्चीवर तरुणीची छेड काढून तिला मारहाण केली होती. हा प्रकार सुधीर याने पाहिला होता. याबाबत आईला सांगेल असे सुधीर याने अमोलला सांगितले होते. त्यामुळे घाबरलेल्या अमोलने त्याला गच्चीवर नेले. तेथे त्याची गळा आवळून हत्या केल्याचे तपासात उघड झाले आहे.

## त्या चावी विक्रेत्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल, पोलिसांनी सूडबुध्दीने कारवाई केल्याचा आरोप

**वसई :** माणिकपूर पोलिसांनी केलेल्या मारहाणीमुळे चर्चेत आलेला चावीविक्रेता मोहम्मद अन्सारी याच्यावर माणिकपूर पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका ग्राहक महिलेला अश्लील शिविगाळ केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. मात्र मी यापूर्वी पोलिसांविरोधात तक्रार केल्याने मला नाहक खोट्या गुन्ह्यात गुंतविल्याचा आरोप चावी विक्रेता अन्सारी याने केला आहे. वसईच्या अंबाडी रोड येथील चावी विक्रेता मोहम्मद अन्सारी हा पुन्हा चर्चेत आला आहे. मे महिन्यात माणिकपूर पोलिसांनी क्षुल्लक वादामुळे त्याला मारहाण केली होती. त्याची दखल मानवाधिकार आयोगाने घेत अन्सारी याला ३ लाखांच्या नुकसान भरपाईचे आदेश दिले होते. आता याच अन्सारीवर एका महिलेच्या तक्रारीवरून विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. मंगळवारी एक ५६ वर्षीय महिला आली. अन्सारी याने बनवलेली चावी निकृष्ट



असल्याचे सांगून तिने वाद घातला. त्यामुळे घाबरून अन्सारी याने माणिकपूर पोलीस ठाण्यात त्या महिलेविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला. परंतु नंतर या महिलेने अन्सारी विरोधातच अश्लील शिविगाळ केल्याचे सांगत विनयभंगाची तक्रार दाखल केली. मी पोलिसांविरोधात तक्रार केल्यानेच मला नाहक या खोट्या गुन्ह्यात अडकविले असल्याचे अन्सारी याने सांगितले. महिला माझ्या दुकानात आली आणि मला शिवीगाळ केल्याने मीच आधी पोलीस ठाण्यात गेलो, असे अन्सारी याने सांगितले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष सुशांत पवार यांनी हा प्रकार म्हणजे पोलिसांची सुडबुध्दी असल्याचा आरोप केला आहे. चावीविक्रेत्याने पोलिसांच्या दादागिरीविरोधात आवाज उठवला म्हणून एका महिलेला पुढे करून हा खोटा गुन्हा दाखल करण्यात आला असा आरोप पवार यांनी केला. पोलिसांनी मात्र हे आरोप फेटाळून लावले आहे. महिला तक्रारदार आमच्याकडे आली आणि तिने दिलेल्या फिर्यादीनुसार आम्ही विनयभंगाचा गुन्हा दाखल केला अशी माहिती माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी दिली.

## अर्नाळा समुद्रात जोडप्याचा आत्महत्येचा प्रयत्न ; मुलीला वाचवले, मुलाचा शोध सुरू



**वसई :** अर्नाळा समुद्रात उडी मारून एका अल्पवयीन जोडप्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. शनिवारी संध्याकाळी ही घटना घडली. स्थानिक जीवरक्षकाने मुलीला वाचविण्यात यश मिळवले आहे. मात्र मुलगा बुडाला असून त्याचा शोध सुरू आहे. विरार पश्चिमेला राहणारे १७ वर्षांचे एक अल्पवयीन जोडपे तीन दिवसांपूर्वी घर सोडून पळून गेले होते. शनिवारी अर्नाळा सागरी पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन पोलीस ठाण्यात आणले होते. दोघांचे जबाब नोंदवून त्यांना पालकांच्या ताब्यात देण्यात आले होते. संध्याकाळी ६ च्या सुमारास हे जोडपे अचानक नजर चुकवून पोलीस ठाण्यासमोर असलेल्या समुद्रकिनारी गेले आणि समुद्रात उडी मारली. स्थानिकांनी बुडणाऱ्या मुलीला वाचवले तर बुडालेल्या मुलाचा शोध सुरू आहे, अशी माहिती परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी दिली.

# कल्याणमध्ये देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मलीन करणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल




**कल्याण** : इतिहासकालीन, चित्रपट अभिनय क्षेत्रातील जुन्या व्यक्तिंच्या छायाचित्रांची तोडमोड करून त्या जागी राज्याचे गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा सामायिक करून फडणवीस यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमा विरुध्द आंबिवलीमधील एका तरूणाने खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. खडकपाडा पोलिसांनी या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून गजाभाऊ या नावाने एक्सवर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बदनामी करणाऱ्या इसमा विरुध्द बुधवारी गुन्हा दाखल केला आहे. प्रथमेश अनंत पाटील असे तक्रारादाराचे नाव आहे. तो अटाळी आंबीवली भागात राहतो. पोलीसांनी सांगितले, गजाभाऊ या एक्स खात्यावर देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा चित्रपटातील गब्बर सिंग या खलनायकाशी, इतिहासकालीन अफझलखानाच्या क्रूर प्रतिमेशी सामायिक करून फडणवीस हे कसे अलीकडच्या काळातील खलनायक आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केला होता. तसेच, एक महिलेच्या चेहऱ्याच्या प्रतिमेवर फडणवीस यांचा चेहरा सामायिक करून महाराष्ट्राचे सुस्त गृहमंत्रालय असे वाक्य लिहून गृह विभाग आणि महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन करण्याचा प्रयत्न केला. या प्रकाराने समाज असुरक्षितेतची भावना निर्माण केली. तसेच, विधान परिषद निवडणुकीसाठी महाराष्ट्र विकास आघाडीचे २० आमदार फोडले, कुणाला कळालेही नाही, असे फडणवीस यांच्या विषयी खोटे लिहून फडणवीसांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला. गजाभाऊ या एक्स खात्यावरून ही बदनामी करण्यात आली आहे. त्यामुळे खडकपाडा पोलिसांनी या खात्याच्या वापरकर्त्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तपास सुरू करून आरोपीला अटक करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# चेंबूरमध्ये वादातून दोघांवर हल्ला, एकाचा मृत्यू

**मुंबई** : चेंबूर येथे जुन्या वादातून सहा जणांच्या टोळीने एकावर चाकूने हल्ला केला. त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या व्यक्तींलाही या टोळीने मारहाण केली. या हल्ल्यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून अन्य एक जण जखमी झाला आहे. याप्रकरणी आरसीएफ पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून त्यापैकी दोघे सराईत आरोपी असल्याची माहित पोलिसांनी दिली. सीताराम जगताप, सुरेश जगताप, रुपेश वैराळ, सागर कांबळे, सुधाकर अवसरमल व रुपेश कांबळे अशी अटक आरोपीची नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यापैकी सीताराम जगताप व सुरेश जगताप दोघेही सराईत आरोपी असून सीताराम विरोधात सहा, तर सुरेश विरोधात तीन गुन्हे दाखल आहेत. वैराळ विरोधातही एक मारहाणीचा गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. चेंबूर मुकुंद नगर परिसरात ही घटना घडली. या टोळीने सिद्धार्थ कांबळे (३२) याच्यावर हल्ला केला. त्यावेळी त्याच्यासोबत असलेला मित्र विकास धेंडे यालाही या टोळीने मारहाण केली. सीताराम जगतापने चाकूने सिद्धार्थ कांबळेवर वार केले. जखमी सिद्धार्थला घाटकोपरमधील राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. सिद्धार्थच्या मानेवर, मनगटावर व पोटावर गंभीर जखमा झाल्या होत्या. गुन्ह्यात वापरलेला चाकू पोलिसांनी हस्तगत केला आहे. यावेळी झालेल्या मारहाणील धेंडेही जखमी झाला असून त्याच्याच तक्रारीवरून आरसीएफ पोलिसांनी आरोपींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.




# अमली पदार्थ विक्री करणाऱ्या एक महीला व इसमाला अटक

**मीरा रोड** : काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या भारतीय इसम व एका परदेशी महिलेला अमली पदार्थ विरोधी शाखेने अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून २ कोटी रुपयांचा १ किलो ९.५ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. आरोपींना ठाणे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मिरा रोड येथे राहणाऱ्या नागरिकाच्या मदतीने परदेशी नागरिक असलेली एक महिला मॅफेड्रॉन (एम.डी. ) हा अमली पदार्थ काशीगाव परीसरात विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर मराठे व त्यांच्या पथकाने सापळा रचून रविवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास घोडबंदर आरटीओ ऑफिस जवळ असलेल्या रस्त्यावर एम.डी. ड्रग्स पुरवठा करणारा सउद सिराज सै-यद (३७), रा.रुम.क्र.२०४, बिल्डींग नं.१, गौरव वुड्स, बेवर्ली पार्क, मिरारोड याला ताब्यात घेतले. त्याची तपासणी केली असता त्याच्याकडे ५०४.१ ग्रॅम वजनाचा १ कोटी ८२ हजार रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आला असताना मिळून आला. तसेच महिला सबरीना रामदानी नुझुंबी ( ३४ ), रा. साथी अपार्टमेंट, प्रगती नगर, हायटेन्शन रोड, नालासोपारा पूर्व मूळ रा. विलेज कारीयाको, दारेसलम सिटी, टांझानिया हिच्याकडे ५०५.४ ग्रॅम वजनाचा १ कोटी १ लाख ८ हजार रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ मिळून आला आहे. या कारवाई मध्ये एकुण २ कोटी २ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परदेशी महिला सबरीना रामदानी नुझुंबी (३४) हिला भारत सरकार कडुन व्हिसा जारी करण्यात आला असून नमुद महिला ही त्या कालावधी पेक्षा जास्त कालावधी साठी भारत देशात बेकायदेशीर रित्या वास्तव्य करत असल्याचे आढळून आले. आरोपी विरुध्द् गुंगीगारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमाच्या विविध कलमासह, विदेशी नागरीक कायदा कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक अमोल आंबवने हे करत आहेत. आरोपींना अटक करून ठाणे न्यायालयात हजर केले असता त्यांना २९ तारखेपर्यंत आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# नवी मुंबईतील महिलेवर सामूहिक अत्याचार आणि हत्या प्रकरण जलदगती न्यायालयात; उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियक्ती



**नवी मुंबई** : शिळफाटा येथील मंदिरात आश्रयासाठी गेलेल्या एका महिलेवर सामूहिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या घटनेचा जलदगतीने तपास करण्यात येईल. याप्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करुन हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा. तसेच या प्रकरणी विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे, नवी मुंबई पोलीस आयुक्त आणि गृह विभागाचे प्रधान सचिव यांना दिल्या. ही अत्यंत गंभीर घटना असून याप्रकरणी ठाणे आणि नवी मुंबई पोलीसांकडे एफआयआर दाखल करण्यात आला आहे. घटना शिळफाटा, ठाणे येथे घडली असून तेथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबरोबरच महिलेच्या आई-वडिलांच्या तक्रारीवरुन नवी मुंबई पोलीसांकडे ४९८ ए कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास चांगल्या पद्धतीने आणि जलदगतीने करण्यात यावा, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत. महिलेवर सामूहिक अत्याचार आणि तिची हत्या करणाऱ्या दोषींना कठोरात कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने या प्रकरणी आरोपपत्र दाखल झाल्यानंतर हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात येईल. तसेच या प्रकरणी विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आणि गृह विभागाचे प्रधान सचिव यांना दिल्या आहेत. या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा होईल यादृष्टीने या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. घरगुती वादविवादाच्या मानसिक तणावात असलेली पीडित महिला ६ जुलै रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास शिळफाटा येथील घोळ गणपती परिसरात आली होती. संपूर्ण रात्र ती या परिसरात होती. या महिलेला मंदिरातील पुजारी श्यामसुंदर प्यारचंद शर्मा (६२), संतोषकुमार रामयज्ञ मिश्रा (४५) आणि राजकुमार रामफेर पांडे (५४) यांनी पाहिले. तिचा गैरफायदा घेण्याच्या उद्देशाने तिघांनी तिच्या चहामध्ये भांगेच्या गोळ्या मिसळून तिला चहा पिण्यास दिला. चहा पिताच तिला भांगेची नशा चढली. तिच्या एकटेपणाचा गैरफायदा घेवून या तिघांनी तिच्यावर बलात्कार केला. महिलेला शुद्ध आल्यानंतर तिने आरडाओरडा करत तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. परंतू, या तीन आरोपींनी त्या महिलेस मारहाण करत तिचे डोके जमिनीवर आपटून गळा दाबून तिची हत्या केली.

## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# घोषणांचाही पाऊस

रेल्वे हा भारतातील सर्वांत मोठा उद्योग आहे. मुंबईसाठी तर उपनगरी रेल्वेसेवा हा श्वासच आहे. असे असूनही केंद्र सरकारने काही वर्षांपूर्वी स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प रद्द केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मुख्य अर्थसंकल्पात रेल्वेच्या नव्या गाड्या, आर्थिक तरतूद, नवे प्रकल्प यांना फारसा स्पर्शही केला नाही. एकीकडे बिहार आणि आंध्र प्रदेश यांच्यावर धनवर्षाव होत असताना महाराष्ट्राला आणि खासकरून रेल्वेला काय मिळाले, हे नागरिकांना कळायला मार्ग नव्हता. यावर उपाय म्हणून दुर्सय़ा दिवशी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घोषणांचा पाऊस पाडला. त्यातील उपगरी रेल्वेसेवेच्या आणखी २५० फेऱ्या वाढणार, हा आकडा प्रथमदर्शनी भारदस्त वाटला तरी पुढच्या पाच वर्षांसाठीचे हे लक्ष्य आहे. तीच गोष्ट महामुंबईत आणि महाराष्ट्रात होर्णाय़ा नव्या टर्मिनलची. परळ येथील रेल्वेच्या विशाल भूखंडावर महास्थानक किंवा टर्मिनल होणार, हे ऐकत ऐकत मुंबईकरांच्या दोन पिढ्यांनी लोकलला लटकत आपला प्रवास पुरा केला आहे. महामुंबईत रेल्वे, मेट्रो, बस, मोनो रेल यांचा समन्वित विचार करून जे काम व्हायला हवे होते, ते आजही झालेले नाही. मुंबईतील मोनो रेलचा प्रकल्प तर पूर्णपणे फसला आहे. चर्चगेट ते विरार यांच्या दरम्यान सध्याच्या रेल्वेमार्गावर दुसरा मार्ग बांधायचा, हे स्वप्न तर दोन दशके खेळविले गेले. या योजनेचा तांत्रिक अहवालही तयार झाला. मुंबईची कुरुपता आणि गर्दी वाढविणारा हा प्रकल्प होता. शेवटी तो पीयूष गोयल रेल्वेमंत्री असताना रद्द झाला आणि मुंबईकरांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. सध्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे कार्यक्षम आणि तंत्रकुशल समजले जातात. एका भीषण रेल्वे अपघातानंतर ७२ तास उभे राहून त्यांनी वाहतूक पुन्हा सुरळीत केली. मात्र, ही कार्यक्षमता मुंबईच्या वाट्याला का येत नसावी ? मुंबईत सन २०२३ मध्ये उपनगरी स्थानकांवर दोन हजार सहाशे प्रवाशांनी प्राण गमावले आहेत. यातील बरेच भरगच्च भरलेल्या गाड्यांमधून पडून मरण पावले तर काही रुळांवर आल्यामुळे. महामुंबईचा परिसर आजही फाटकमुक्त झालेला नाही. जितके प्रवासी प्राणांस मुकतात, त्याच्या किमान दुप्पट जखमी होतात. सध्या दोन गाड्यांमध्ये असणारे १८० सेकंद म्हणजे तीन मिनिटांचे अंतर केवळ कागदोपत्री आहे. वर्षभरात किमान ५० प्रसंग असे येतात की जेव्हा प्रवासी गाडीसाठी अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ खोळंबतात. उद्या दोन गाड्यांमधले अंतर १५० सेकंद झाले आणि ते खरोखरच प्रत्यक्षात आले तर दर अडीच मिनिटांनी स्थानकांमध्ये येऊन आदळणारे गर्दीचे लोंढे पेलण्याची क्षमता ना स्थानकांची आहे; ना जिन्यांची किंवा सध्याच्या सरकत्या जिन्यांची. काही वर्षांपूर्वी अनेक निरपराध जीव प्राणास मुकल्यावर परळ स्थानकात चार कामे झाली. मात्र, आजही कुर्ला, घाटकोपर, ठाणे, विरार, कल्याण आदी स्थानके अनावर गर्दीचा सामना करीतच आहेत. मुंबईतील मेट्रोच्या कामाला अक्षम्य विलंब झाला आहे. त्याचा दोष राजकीय साठमारीवरही जातो. आजही हे वेळापत्रक रुळावर आलेले नाही. रोजचा प्रवास असह्य झालेल्या मुंबईला बुलेट ट्रेनची खरेच गरज आहे का, याचा गंभीर विचारही कुणी केला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि लोकमान्य टिळक टर्मिनसवरील नव्या, वाढीव फलाटांचे उद्घाटन केले. मात्र, एलटीटी येथे आणखी चार नवे फलाट या आधीच व्हायला हवे होते. ते आता होतील, असे वैष्णव म्हणाले आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये रेल्वे खात्याने मोठ्या स्थानकांवर प्रचंड बांधकामे केली आहेत. नवे जिने किंवा विस्तीर्ण कॉरिडॉर बांधले आहेत. मात्र, ते प्रवाशांच्या सोयीचे आहेत का किंवा ते वापरले जातात का, याचा काही विचार होत नाही. आज असे कित्येक वापरले न जाणारे जिने किंवा कॉरिडॉर भलत्याच गोष्टींसाठी वापरले जातात. महामुंबईच्या उपनगरी रेल्वेसेवेसाठी एक स्वतंत्र विभाग करावा, अशी सूचना मागेच आली होती. ती आजही अमलात आलेली नाही. पश्चिम आणि मध्य रेल्वे यांच्यातील समन्वयाचा अभाव हाही अनेकदा मुंबईकरांना वाढता त्रास सोसायला लावतो. देशातील दुसऱ्या क्रमांकाचा निधी यंदा महाराष्ट्रासाठी राखून ठेवला आहे; असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले. मात्र, या निधीचे रूपांतर कामात होणे आणि त्या कामांचा अनुभव रोजच्या प्रवासात येणे, हे महामुंबईत अजूनतरी स्वप्नच आहे. उपगरी रेल्वेसेवेचा वापर करणारे ८० लाख मुंबईकर देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात मोठी भर घालत असतात. त्यांचा प्रवास सुखकर, सुरळीत आणि सुरक्षित होण्यासाठी केवळ रेल्वेच नव्हे तर सर्वच यंत्रणांनी एकत्र येऊन युद्ध पातळीवर काम करण्याची गरज आहे. मात्र, त्यासाठी नगर नियोजन, घरबांधणी आणि सर्व वाहतूक सुविधांच्या समन्वयापर्यंत नव्या दृष्टीने चौफेर काम करावे लागेल. ते कधी होईल ?

# यूपीएससी ची तयारी : बदलता समाज -गतिशील मुद्दे

भारतीय समाजातील सद्या:कालीन मुद्दे महत्त्वाचे आहेत कारण ते समाजातील बदलांचा अभ्यास करायला मदत करतात. हे मुद्दे परीक्षार्थींना सामाजिक समज आणि विश्लेषणात्मक कौशल्ये वाढवण्यास मदत करतात, ज्यामुळे ते प्रभावी प्रशासन व धोरण निर्मितीत योगदान देऊ शकतात.

परीक्षेकरिता काही महत्त्वाचे मुद्दे:

मासिक पाळीच्या काळात वेतनासह सुट्टी : महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने मासिक पाळीच्या काळात वेतनासह सुट्टी हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. भारतातील अनेक महिला मासिक पाळीदरम्यान शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करतात. कामाच्या ठिकाणी याची समज नसल्यामुळे अनेक महिला या काळात कामावर हजर राहूनही उत्पादकतेत घट अनुभवतात. केरळ आणि बिहारसारख्या काही राज्यांनी महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या काळात वेतनासह सुट्टी दिली आहे. या धोरणामुळे महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास मदत होते आणि त्यांना आवश्यक विश्रांती मिळते. परंतु, हा मुद्दा अनेक ठिकाणी अजूनही वादग्रस्त आहे. काही लोकांना वाटते की, अशा सुट्ट्यांमुळे महिलांना कामाच्या ठिकाणी अधिक भेदभाव सहन करावा लागू शकतो. या मुद्द्यावर चर्चा वाढविण्यासाठी आणि महिलांच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी सामाजिक जागरूकता वाढविणे आवश्यक आहे. कंपन्यांनी त्यांच्या धोरणांमध्ये या सुट्ट्यांचा समावेश करावा आणि महिलांना योग्य सहकार्य द्यावे. यामुळे महिलांच्या कार्यक्षमता आणि आत्मविश्वासात वाढ होईल.

आदिवासी अस्मिता: वनवासी विरुद्ध आदिवासी वाद : आदिवासी अस्मिता हा मुद्दा भारतातील सामाजिक व राजकीय चर्चेचा एक महत्त्वाचा भाग आहे. आदिवासी समाजाचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आदिवासी हा शब्द वापरला जातो. परंतु, काही ठिकाणी वनवासी हा शब्द अधिक प्रचलित आहे. आदिवासी हा शब्द त्यांच्या मूळ सांस्कृतिक ओळखीचा आणि अधिकारांचा उल्लेख करतो, तर वनवासी हा शब्द केवळ जंगलात राहणारे असा संदर्भ देतो. त्यामुळे, वनवासी या शब्दाचा वापर आदिवासींच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अधिकारांना कमी मानण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप



केला जातो.

या वादामुळे आदिवासी समाजात विभाजन निर्माण होऊ शकते. आदिवासी समाजाच्या हक्कांची रक्षा करण्यासाठी आणि त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेचा आदर राखण्यासाठी योग्य शब्दांचा वापर करणे आवश्यक आहे. सरकार आणि सामाजिक संघटनांनी या मुद्द्यावर समन्वय साधून आदिवासींच्या हक्कांची रक्षा करावी.

जातीय गणना: समस्या, शक्यता आणि भविष्यवाणी : जातीय गणना हा एक वादग्रस्त मुद्दा आहे, ज्यामुळे समाजातील विविध घटकांमध्ये मतभेद निर्माण होऊ शकतात. भारतात जातीय गणनेची मागणी अनेक दशकांपासून होत आहे. यामुळे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक माहिती मिळू शकते. जातीय गणनेच्या समर्थनार्थ, यामुळे समाजातील विविध घटकांचे खरे चित्र स्पष्ठ होईल आणि त्यांच्या समस्यांना योग्य प्रतिसाद देण्यासाठी योजना तयार करता येतील. परंतु, विरोधकांचा तर्क आहे की यामुळे समाजात जातीयतेचे विभाजन वाढेल आणि सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होईल. जातीय गणनेच्या अंमलबजावणीसाठी सरकारने सर्वसमावेशक चर्चा आणि सल्लामसलत करून योग्य निर्णय घ्यावा. यामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक बळकट होईल आणि समाजातील सर्व घटकांना न्याय मिळेल.

शालेय अभ्यासक्रमातील बदल आणि त्याचा सामाजिकरणावर परिणाम : शालेय अभ्यासक्रमातील बदल हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, कारण यामुळे समाजातील मुलांच्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो. नवीन शैक्षणिक धोरणानुसार, शालेय अभ्यासक्रमात विविध बदल करण्यात आले आहेत. या बदलांमुळे मुलांना अधिक व्यावहारिक शिक्षण मिळू शकते आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास होऊ शकतो. परंतु, अभ्यासक्रमातील काही बदलांमुळे मुलांच्या नैतिक आणि सामाजिक शिक्षणावर परिणाम होऊ शकतो. उदाहरणार्थ, इतिहासाच्या पुस्तकांमधून काही महत्त्वाच्या घटनांचा वगळण्यात आलेला उल्लेख विवादास्पद ठरला आहे. शालेय अभ्यासक्रमातील बदल करताना समाजाच्या सर्व घटकांच्या विचारांची आणि अपेक्षांची दखल घेणे आवश्यक आहे. शिक्षकांनी मुलांच्या समाजीकरणाची प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक पद्धतीत योग्य बदल करावेत.

समकालीन सामाजिक मुद्द्यांचा विचार करताना आपल्याला व्यापक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. या मुद्द्यांवर योग्य चर्चा आणि उपाययोजना करूनच आपण एक सशक्त आणि समृद्ध समाज घडवू शकतो. समाजातील सर्व घटकांच्या हक्कांची आणि गरजांची दखल घेणे आपले कर्तव्य आहे. यूपीएससीच्या आगामी २०२४ मुख्य परीक्षेत विद्यार्थ्यांनीभारतीय समाज आणि सामाजिक समस्या भागासाठी खालील विषयांची तयारी करावी.

हवामान बदल आणि त्याचा समाजातील दुर्बल घटकांवर होणारा परिणाम.

समलिंगी संबंध आणि लग्नाचे बदलते स्वरूप आणि कुटुंबव्यवस्था.

समान नागरी कायदा आणि भारतातील विविधता.

जातीय चळवळी आणि वांशिक हिंसा.

तुमच्या अभ्यासासाठी आणि परीक्षेसाठी खूप खूप शुभेच्छा.

# कल्याणमध्ये केस सजावटकार महिलेवर लैंगिक अत्याचार करून ठार मारण्याची धमकी

**कल्याण** : कल्याणमधील एका २१ वर्षाच्या केश सजावटकार (हेअर ड्रेसर) महिलेला तिच्या जुन्या मित्राने आपल्याला मित्राच्या वाढदिवसाला जायचे आहे, असे सांगून तिला कल्याण पूर्वेतील एका लॉजवर नेले. तेथे तिच्या मनाविरूध्द लैंगिक अत्याचार केले. हा प्रकार कोणाला सांगितला तर तिला जीवे ठार मारण्याची धमकी देऊन तिला लॉजमधील खोलीत डांबून ठेऊन पळून गेलेल्या एका ३० वर्षाच्या तरूणा विरुध्द महिलेने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. रणविजय माधव सिंग (३०, रा. कालीमाता मंदिराजवळ, उतेकर चौक, नूतन शाळेजवळ, कल्याण पूर्व) असे आरोपीचे नाव आहे.



पीडित महिला कल्याणमध्ये केश सजावटकार म्हणून काम करते. मंगळवार ते बुधवार या दोन दिवसांच्या कालावधीत रात्रीच्या वेळेत कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी मधील श्री लॉजमध्ये हा प्रकार घडला आहे. पोलिसांनी सांगितले, पीडित केश सजावटकार महिला आणि आरोपी तरूण हे पूर्वीचे एकमेकांचे मित्र आहेत. पीडिता या तरूणाला त्यामुळे ओळखत होती. मंगळवारी सकाळी आरोपी रणविजय सिंग याने पीडितेला आपल्या एका मित्राचा वाढदिवस आहे. त्यासाठी आपणास त्या वाढदिवस मेजवानीसाठी कल्याण पूर्वेत कोळसेवाडीत जायचे आहे असे खोटे सांगितले. रणविजयच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन पीडिता रणविजय बरोबर कल्याण पूर्वेत गेली. आरोपीने पीडितेला कोळसेवाडी मधील श्री लॉजमध्ये नेले. येथेच वाढदिवस साजरा होणार आहे, असे पीडितेला खोटे सांगितले. काही वेळाने रणविजयने पीडितेला दमदाटी करून तु माझ्या जीवनात येणार नसशील तर मी तुला कोणाचीही होऊन देणार नाही. तू परत माझ्याशी स्नेहसंबंध ठेव, असे बोलून पीडितेला बेदम मारहाण करून तिला जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपीने पीडितेवर तिच्या मनाविरुध्द जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. तिला लॉजच्या खोलीत डांबून ठेऊन बाहेरून कुलूप लावून तेथून पसार झाला. लॉज चालकाला हा प्रकार कळल्यानंतर त्यांनी लॉजची खोली उघडली. त्यावेळी पीडिता आतमध्ये असल्याचे समजले. पीडितेने रणविजय विरुध्द कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक या प्रकरणाचा तपास करत आहे.

# जाहीरात फलक मालक आणि अधिकाऱ्यांमध्ये भागीदारी, मनसेच्या आरोपामुळे खळबळ

**ठाणे** : मुंबई येथील घाटकोपर भागातील जाहिरात फलक दुर्घटनेनंतर ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच परवानगीपेक्षा जास्त आकाराचे फलक उभारण्यात आल्याचा मुद्दा गाजत असतानाच, त्यावर पालिकेकडून केवळ हे फलक काढून टाकण्यापुरतीच कारवाई होत असल्याच्या कारणावरून पालिकेवर टीका होऊ लागली आहे. याच मुद्द्यावरून जाहीरात विभागातील अधिकारी आणि जाहिरात फलकांचे मालक यांच्यातील भागीदारीमुळेच कठोर कारवाई करण्याऐवजी केवळ बघ्याची भूमिका घेतली जात असल्याचा गंभीर आरोप मनसेच्या स्थानिक नेत्यांनी केला आहे. तसेच या दोघांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करत तसे झाले नाहीतर न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. मुंबईतील घाटकोपर भागात जाहिरात फलक कोसळून नागरिकांचा मृत्यु झाला. या घटनेनंतर ठाणे शहरातील जाहीरात फलकांचा मुद्दा ऐरणीवर आला. या फलकांच्या मुद्द्यावरून टिका होऊ लागताच पालिकेने त्यावर कारवाईचा बडगा उगारला. शहरातील ४९ फलकांवर पालिका प्रशासनाने कारवाई केली. त्यात ५ जाहिरात फालक पुर्णपणे निष्काषित केले तर, परवानगीपेक्षा जास्त आकाराच्या ४४ फलकांचे पत्रे काढण्यात आले. असे असले तरी अशाप्रकारे नियमबाह्य फलक उभारणाऱ्यांवर पालिकेकडून मात्र कोणतीच कारवाई होताना दिसून आलेली नाही. याच मुद्द्यावरून पालिका प्रशासनावर टिका होत असतानाच, आता महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी हा मुद्दा उपस्थित करत या संदर्भात ठाणे महापालिका आयुक्तांना पत्र दिले आहे. घाटकोपर दुर्घटनेनंतर खडबडून जागे झालेल्या ठाणे महापालिकेने शहरात परवानगी पेक्षा जास्त आकाराच्या ४४ जाहिरात फलकांचा अतिरिक्त भागाचा फक्त पत्रा काढण्याची कारवाई केली. जाहिरात फलक कंपनी आणि महापालिका अधिकारी यांच्यात भागीदारी असल्यामुळेच कठोर कारवाई करण्यात येत नसून केवळ बघ्याची भूमिका घेतली जात आहे. गेली कित्येक वर्षे जाहिरातबाजी करून पैसे कमविणाऱ्या जाहिरात फलक मालकांना कोणताही दंड ठोठावण्यात आला नसून महापालिका फक्त कारवाईचा दिखावा करत आहे, असा आरोप पाचंगे यांनी केला आहे. पालिकेने तात्काळ सर्व ४९ जाहिरात फलक मालकांविरुद्ध तसेच जाहिरात फलक उभारणीसाठी परवानगी देताना खोटा स्थळ पाहणी अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पुढील ८ दिवसांत ही कारवाई केली नाहीतर न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. शहरातील महत्वाचे रस्ते, चौकातील मोक्याच्या जागा पकडून तेथे लोखंडी होर्डिंग उभारले जातात. हे होर्डिंग उभारताना महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र व्यवसायिक आणि अधिकारी याकडे सोईस्कर दुर्लक्ष करतात, त्यामुळे अनधिकृत होर्डिंगची संख्या दिवसागणित वाढत आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचना क्र ५ नुसार जाहिरात फलक प्रदार्शित करण्यावरील निर्बंधांमध्ये पदपथावर आणि सार्वजनिक रस्त्यावर कोणताही जाहिरात फलक उभारण्यास मनाई आहे. जाहिरात फलक परवानगी घेतलेल्या भूखंडाच्या बाहय सीमा रेषे बाहेर येता कामा नये, खाडीत होर्डिंग उभारता येणार नाही यांसारख्या अटींचे पालन अजूनही होताना दिसत नाही, असा आरोप पाचंगे यांनी केला आहे.




# खड्ड्यामुळे तरुणाचा मृत्यू, मागून येणाऱ्या भरधाव मोटारीची धडक; शिळफाटा भागातील घटना

**ठाणे** : शिळ डायघर येथील कल्याण शिळ रोड भागात खड्ड्यात दुचाकी जाऊन तोल गेल्याने एका दुचाकीस्वाराला मागून भरधाव मोटारीने धडक दिली. या घटनेत दुचाकीस्वार सागर मिसाळ (२२) याचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे खड्ड्यांचा प्रश्न ऐरणीवर आला असून संताप



व्यक्त केला जात आहे. सागर मिसाळ हा बुधवारी रात्री २ वाजताच्या सुमारास नवी मुंबईच्या दिशेने दुचाकीवरून जात होता. तो कल्याण शिळ मार्गावरील मातेश्वरी अल्टुरा गृहसंकुल परिसरात आला असता, मुख्य रस्त्यावर खड्डा पडलेला होता. या खड्ड्यात त्याची दुचाकी गेली. त्यामुळे त्याचा दुचाकीवरुन तोल गेला. त्याचवेळी मागून भरधाव येणाऱ्या एका मोटारीने त्याच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात त्याच्या डोक्याला मार लागला तसेच अंतर्गत जखमा झाल्या. त्याला उपचारासाठी देसाई गाव भागातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु त्याचा मृत्यू झाला. सुरुवातीला या अपघाताची नोंद अपमृत्यू म्हणून करण्यात आली होती. सागर यांच्या नातेवाईकांनी सीसीटीव्ही तपासल्यानंतर त्याच्या मामांनी याप्रकरणी शिळ डायघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे मोटार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातानंतर शहरातील खड्ड्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यात सर्वच महत्त्वाच्या मार्गांवर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांवर तात्पुरती दुरुस्ती करुन ते भरले जातात. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

# ठाण्यात पावसामुळे पोलिस भरती पुढे ढकलली

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यात सुरू असलेला मुसळधार पाऊस आणि हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे ठाणे पोलिस भरतीसाठी २६ आणि २७ जुलैला होणारी मैदानी चाचणी पुढे ढकलत १ आणि २ ऑगस्ट रोजी घेण्याचा निर्णय ठाणे पोलिसांनी घेतला आहे. ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलिस शिपाई संवर्गातील ६६६ तर, चालक पोलिस शिपाई संवर्गातील २० रिक्त पदांसाठी भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. या भरती प्रकीयेसाठी २६ आणि २७ जुलैला महिला उमेदवारांची मैदानी चाचणी साकेत मैदान येथे घेण्यात येणार होती. परंतु ठाणे जिल्ह्यात सुरू असलेला मुसळधार पाऊस आणि हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे उमेदवारांची मैदानी चाचणी घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे २६ आणि २७ जुलैला होणारी मैदानी चाचणी पुढे ढकलत ही चाचणी १ आणि २ ऑगस्ट रोजी घेण्याचा निर्णय ठाणे पोलिसांनी घेतला आहे, अशी माहिती ठाण्याचे अप्पर पोलिस आयुक्त (प्रशासन) संजय जाधव यांनी दिली.



# घोडबंदर किल्ला भाड्याने देणे आहे : मिरा-भाईंदर महापालिकेच्या ठरावामुळे वाद

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील ऐतिहासिक घोडबंदर किल्ला भाडेतत्वावर चालवण्यास देण्याचा वादग्रस्त निर्णय महालिकेने घेतला आहे. यासंदर्भात सुधारित ठराव अलिकडेच मंजूर करण्यात आला आहे. पालिकेने राज्य शासनाकडून हा किल्ला देखभालीसाठी आपल्या ताब्यात घेतला होता. मात्र आता तो थेट भाडत्वावर देण्याच्या निर्णयाने संताप व्यक्त होत आहे. २०१९ मध्ये घोडबंदर किल्ला महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनें अतर्गत महापालिकेकडे देखभाल दुरुस्तीसाठी वर्ग करण्यात आला. पालिकेने पुरातत्त्व विभागाच्या मदतीने किल्ल्याच्या संवर्धनाचे काम हाती घेतले. आता हा किल्ला पालिकेने भाडेतत्वावर देण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या वास्तूंना भाडेतत्त्वावर देऊन उत्पन्न मिळविण्याचा सुधारित ठराव पालिकेने ९ जुलै रोजी मंजुर करण्यात आला असून त्यात भाईंदर पश्चिम येथील क्रीडा संकुल, आप्पासाहेब धर्माधिकारी हॉल, मैदाने, उद्यानांबरोबरच




घोडबंदर किल्ल्याचाही समावेश आहे. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूच्या अस्तित्वाला धोका निर्माण होण्याची भीती आहे. केवळ उत्पन्न मिळविण्यासाठी थेट किल्लाच भाड्याने देण्याच्या निर्णयावर टीका होत असून गडप्रेमी आंदोलनाच्या तयारीत आहेत.

याबाबत विचारणा केली असता, केवळ किल्ल्यावरील रोषणाई कार्यक्रम व इतर गोष्टी भाडेतत्त्वावर देणार असल्याचे स्पष्टीकरण महापालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी दिले. मात्र किल्ल्यावर अद्यापही महापालिकेकडून कोणताही रोषणाई कार्यक्रम व इतर कोणत्याही गोष्टीची उभारणी करण्यात आलेली नसून तसा कुठलाही ठराव करण्यात आलेला नाही. त्यामुळे हा निर्णय अंगलट आल्याने पालिका सारवासारव करत असल्याचे चित्र आहे. घोडबंदर किल्ल्याला पाचशे वर्षांचा इतिहास आहे. १५२०नंतर पोर्तुगीजांनी हा किल्ला बांधला. याच किल्याच्या बंदरावर अरब व्यापारी घोड्याचा व्यवसाय करत असत. १७३९ साली मराठ्यांनी वसईच्या मोहिमेत हा किल्ला जिंकला. बराच काळ किल्ल्यावर मराठ्यांचे साम्राज्य होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवरून परतताना किल्ल्याची पाहणी केल्याचा दावा इतिहासकार करतात.

# ठाण्यात ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**ठाणे :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी राजिनामे दिले. अंतर्गत गटबाजीला कंटाळून सामूहिक राजीनामे देत असल्याचे पत्रात म्हटले आहे. या राजिनाम्यांमुळे ठाण्यात ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडल्यानंतर माजी खासदार राजन विचारे हे अद्यापही उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहेत. राजन विचारे यांच्यासह युवासेनेचे काही पदाधिकाऱ्यांनीही उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला होता. शुक्रवारी ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख अर्जुन डाभी, शहर अधिकारी किरण जाधव, बाळकुम येथील शाखाप्रमुख अभिषेक शिंदे, उपसमन्वयक दिपक कनोजिया आणि खोपटचे विभाग अधिकारी राज वर्मा यांनी




राजिनामा दिला आहे. त्यासंदर्भाचे पत्र त्यांनी युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना पाठिवले आहे. गेली १५ वर्षे सातत्याने युवासेना स्थापनेपासून युवकांचे संघटन ठाणे शहरात मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि एकनिष्टेने आम्ही दिवस-रात्र काम करत होते. प्रसंगी विरोधकांना अंगावरही घेतले. परंतु दोन वर्षांत काही निवडक पदाधिकाऱ्यांनी सुरु केलेल्या अंतर्गत गटबाजीमुळे आमच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित केले गेले. त्यामुळे आम्ही राजीनामा देत आहोत असे पत्रात म्हटले आहे. या राजीनाम्यांमुळे ठाण्यात ठाकरे गटाला धक्का मानला जात आहे. संकटाच्या काळात खांद्याला खादा लावून लढत आहेत. त्यांचा विचार करू. सोडून जाणाऱ्यांचा विचार बाळासाहेब आणि दिघे साहेबांनी केला नाही. ठाण्यात शिवसेना नव्याने उभी राहत आहे. बाळासाहेब आणि दिघे साहेब यांचे विचार पुढे घेऊन जाणारी नवी पिढी समोर येत आहे. - केदार दिघे, ठाणे जिल्हाप्रमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे.

# दलालांमुळे मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलिन; जनतेत योग्य संदेश जात नसल्याची गणेश नाईकांची टीका

**नवी मुंबई :** सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि राज्य सरकारमध्ये काही छुप्या दलालांचा छुपा वावर आहे. याचा प्रतिकूल परिणाम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडायला लागला आहे, अशी टीका भाजप नेते गणेश नाईक यांनी सोमवारी येथे पत्रकारांशी बोलताना केली. मी मुख्यमंत्र्यांना भेटलो तेव्हा त्यांना स्पष्टपणे सांगितले की लोकांमध्ये एकूण जो संदेश जात आहे तो नीट जात नाही. मुख्यमंत्री माझ्या म्हणण्याची दखल घेतील आणि ते तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री सरकारला काळिमा लागेल, लोकांमध्ये रोष निर्माण होणार नाही अशी पावले उचलतील, अशी अपेक्षाही नाईक यांनी या वेळी व्यक्त केली. ऐरोली तसेच बेलापूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नाईक यांनी सोमवारी त्यांच्या खैरणे एमआयडीसी येथील कार्यालयात एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीनंतर नाईक यांनी पत्रकारांशी बोलताना



पुनर्विकास प्रकल्प, त्यासाठी देण्यात येणारे वाढीव चटईक्षेत्र, सिडको तसेच एमआयडीसीकडून होणारे भूखंड वाटपाच्या धोरणावर टीका करताना राज्य सरकारमध्ये दलालांचा वावर असल्याच्या आरोपांचा पुनरुच्चार केला. ठाणे-बेलापूर या गर्दीच्या रस्त्यालगत असलेल्या सेवा रस्त्यांना लागून असलेले मोक्याचे भूखंड विकण्याचा सपाटा एमआयडीसीने लावला आहे. सेवा रस्त्यांना लागून असलेल्या या भूखंडांवर व्यापारी संकुले उभी राहिली तर भविष्यात कोंडी होईल असे नाईक यांनी नमूद केले. मुंबई महानगर प्रदेशात झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबवत असताना दहा चटईक्षेत्र वापरात आणण्याचे उद्योग केले जात आहेत, असा आरोपही नाईक यांनी या वेळी केला. दहा चटईक्षेत्र जर या शहरांमध्ये वापरला गेला तर भविष्यात शहरे बेसुमार वाढतील. इतक्या मोठ्या लोकसंख्येसाठी लागणारे पाणी, शिक्षण-आरोग्याच्या सोयी कुठून निर्माण करायच्या? भविष्यातील पिढीला संकटात टाकायचे हे उद्योग आहेत, असा आरोप नाईक यांनी केला. नवी मुंबईत हे मी होऊ देणार नाही. अशा निर्णयांविरोधात रस्त्यावर उतरेन, असा इशारा त्यांनी दिला. पुनर्विकासाचे प्रकल्प राबवायचे असतील तर ते बिल्डरांऐवजी म्हाडा, सिडकोसारख्या सरकारी संस्थांच्या मदतीने आणि कमी चटईक्षेत्राचा वापर करून राबवा, असा सल्लाही त्यांनी दिला.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरू सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789